माहिती हवीय?

प्रदीप बरबडे, यवतमाळ.

□ ओ. पी. रल्हनने दिग्दर्शित केलेले चित्रपट कोणते? सध्या ते काय करीत आहेत?

— *मुजरीम, गहेरा दाग, फूल और पत्थर, तलाश, हलचल, पापी प्यास* हे ओ. पी. रल्हननी दिग्दर्शित केलेले चित्रपट. आज ते हयात नाहीत.

□ शक्ती सामंत आणि जे. ओमप्रकाश यांनी दिग्दर्शित केलेले चित्रपट कोणते? सध्या ते काय करतात?

— *बहू, इन्स्पेक्टर, शेरू, हिल स्टेशन, डिटेक्टीव्ह, हावडा ब्रिज, इन्सान जाग उठा, जाली नोट, सिंगापूर, चायना टाऊन, इसी का नाम दुनिया है, नॉटी बॉय, काश्मिर की कली, ॲन इव्हिनिंग इन पॅरिस, आराधना, कटी पतंग, अमर प्रेम, जाने अनजाने, अनुराग, अजनबी, चरित्र हीन, अमानुष, मेहबूबा, आनंद आश्रम, बरसात की एक रात, आवाज, द ग्रेट गॅम्बलर, गीतांजली* हे शक्ती सामंतानी दिग्दर्शित केलेले चित्रपट. *आप की कसम, अपनापन, आशा, आसपास, अपना बना लो, आखिर क्यों?, आप के साथ, भगवानदादा, आदमी, खिलौना है* हे जे. ओमप्रकाशनी दिग्दर्शित केलेले चित्रपट. ते दोघेही सध्या निवृत्त जीवन जगत आहेत. जे. ओमप्रकाशनी तर संन्यास घेतलाय.

भरत चंद्रकांत कालुवाला, माहिम कॉजवे, मुंबई.

□ लाला-असर-सतार यांनी कोणकोणत्या चित्रपटांना संगीत दिलं?

— लाला-असर-सतार यांनी *संग्राम* या एकाच चित्रपटाला संगीत दिलं. लाला-सतारनी आपली जोडी जमवून *अरेबियन नाईट्स*सारखे एक दोन चित्रपट संगीतबद्ध केले.

महेश पारखे, कोपरगांव.

□ 'ये राते ये मौसम नदी का किनारा...' हे गाणं किशोरकुमारने कोणत्या चित्रपटत गायलंय?

— *दिल्ली का ठक* या चित्रपटात किशोरकुमारने हे गाणं आशा भोसलेंच्याबरोबर गायलं होतं.

□ 'पहले प्यार की खुशबू शायद तुम्हारे साँसो से आ रही है...' हे गाणं लता मंगेशकरनी कोणत्या चित्रपटात गायलंय?

— 'पहले प्यार की खुशबू शायद तुम्हारे साँसो से आ रही है...' हे गाणं लता मंगेशकरनी *बदलते रिश्ते* या चित्रपटात गायलंय.

उमेश श्याम दातार, जळगाव.

□ रफीने गायलेलं 'दिल का सुना सा तराना ढुंढेगा, तिरे निगाहेना निशाना ढुंढेगा, अरे मुझको मेरे बाद जमाना ढुंढेगा...' हे गीत कोणत्या चित्रपटातलं आहे? नायक-नायिका कोण?

— 'दिल का सुना सा तराना ढुंढेगा, तिरे निगाहेना निशाना ढुंढेगा, अरे मुझको मेरे बाद जमाना ढुंढेगा...' हे गीत *एक नारी दो रूप* या चित्रपटातलं आहे. शत्रुघ्न सिन्हा-रेश्मा हे नायक-नायिका आहेत.

अशोक वा. कोर्टीकर, पंढरपूर.

□ महात्मा गांधींच्या जीवनावर आतापर्यंत कोणकोणते चित्रपट निघालेत?



हे! राममध्ये गांधीजींच्या भूमिकेत नसीरुद्दीन शहा

— महात्मा गांधींच्या जीवनावर आतापर्यंत *नाईन अवर्स टू रामा, गांधी, हे! राम* हे चित्रपट निघालेत.

अशोक परशुराम परब, ठाणे(पश्चिम).

□ भारत-पाक संबंध या विषयावर आतापर्यंत कोणकोणते चित्रपट प्रदर्शित झालेत?

— भारत-पाक संबंध या विषयावर आतापर्यंत *गर्म हवा, जोहर इन काश्मीर, हीना, सरफरोश, बॉर्डर, गदर, एलओसी* हे चित्रपट प्रदर्शित झालेत.

□ मेहमूदने आतापर्यंत कोणकोणत्या चित्रपटांत पार्श्वगायन केलंय?

— *पूर्णिमा, वरदान, सबसे बडा रुपय्या, कुंवारा बाप* या चित्रपटांत मेहमूदने पार्श्वगायन केलंय.

सौ. चारुलता डोरले, नरेंद्र नगर, नागपूर.

□ जयश्री शांताराम आणि बेबी शकुंतला या नायिकांनी भूमिका केलेला पहिला आणि शेवटचा हिंदी चित्रपट कोणता?

— जयश्री शांतारामचा पहिला हिंदी चित्रपट *शकुंतला* आणि शेवटचा चित्रपट *रामलीला*. बेबी शकुंतलाने नायिकेची भूमिका केलेला पहिला चित्रपट *बच्चों का खेल* आणि शेवटचा चित्रपट *देवयानी*.

□ फाळणीनंतर पाकिस्तानला गेलेली *अनमोल घडी*ची नायिका नूरजहाँ हिचा पहिला आणि भारतातला शेवटचा चित्रपट कोणता?

— फाळणीनंतर पाकिस्तानला गेलेली *अनमोल घडी*ची नायिका नूरजहाँ हिचा भारतातला पहिला चित्रपट *मिसूर का सितारा* आणि शेवटचा चित्रपट *जुगनू*.

वैजयंती शिर्सेकर, विक्रोळी.

□ *अबोली* नावाचा चित्रपट किती साली प्रदर्शित झाला? त्याचे कलाकार कोण होते?

— *अबोली* या नावाचे दोन मराठी चित्रपट आजवर प्रदर्शित झाले आहेत. यातला १९५३ साली पहिला चित्रपट प्रदर्शित झाला. दत्ता धर्माधिकारी त्याचे निर्माता होते. दिग्दर्शक अनंत माने आणि नायक विवेक तर नायिका बेबी शकुंतला हे होते. १९९५मध्ये दुसरा *अबोली* प्रदर्शित झाला. अमोल शेडगे त्याचे निर्माता होते आणि दिग्दर्शक होते तर दुसरे निर्माता निशिकांत सदाफुले संगीतकार होते. प्रमुख कलाकारांत सयाजी शिंदे, रेणुका शहाणे आणि वर्षा उसगावकर ही नावं सांगता येतील.

मानसी चव्हाण, मालवण.

□ बेबी तब्बस्सुम कोणकोणत्या चित्रपटात बालतारका होती?

— *नरगीस, मजधार, मेरा सुहाग, लखपती, बडी बहन, छोटी भाभी, जोगन, राज मुकूट, सरगम, संग्राम, आराम, अफसाना, बहार, दीदार, गुमास्ता, काले बादल, बैजू बावरा, मोती महल, राजरानी दमयंती, शिन शिना की बुबलाबू, बाप बेटी* या चित्रपटात बेबी तब्बस्सुम बालतारका होती.

मनीष वारखणकर, रायगड.

□ अरुणकुमार यांनी संगीतबद्ध केलेले चित्रपट कोणते? अशोककुमारशी त्यांचे काही नाते होते काय?

— *प्रतिमा, परिणीता, तीन भाई, शमशीर, समाज* यासारख्या काही चित्रपटांना अरुणकुमारनी संगीत दिले. ते अशोककुमारचे मावस भाऊ होते.